**जोडपत्र - ४**

**महापरिपत्रक**

**<u>कॅश रिझर्व रेशो (सीआरआर) व स्टॅट्युटरी लिक्विडिटी रेशो (एसएलआर)</u>**

**बँकिंग विनियम अधिनियम, १९४९**

**फॉर्म - १**
**(नियम पहा)**
**[कलम १८(१) व २४(३)]**
**[परिच्छेद ४.२,५.२ व ५.९ अन्वये]**

सहकारी बँकेचे नाव :

अहवाल सादर करणा-या अधिका-यांची नावे व हुद्दे :

**------ ह्या महिन्यासाठी, भारतातील डिमांड व टाईम लायाबिलिटीज आणि रोख रक्कम, सोने व भाररहित सिक्युरिटीजमध्ये भारतात ठेवलेली रक्कम ह्याबाबतचे विवरणपत्र**

ह्या अहवालातील निरनिराळ्या बाबींच्या रकमा, ह्या अहवालाच्या शेवटी असलेल्या तळटीपांमध्ये निर्देश केलेल्या तडजोडी (आवश्यक असेल तिथे) विचारात घेऊन काढल्या जाव्यात

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| (जवळच्या हजारापर्यंत राऊंड ऑफ केल्या आहेत) | | | | | | |
| | | | | ------ रोजी व्यवहार बंद झाल्यावर | | |
| | | | | **प्रथम एका आडचा शुक्रवार (तारीख)** | **दुसरा एका आडचा शुक्रवार (तारीख)** | **तिसरा एका आडचा शुक्रवार (तारीख)** |
| १ | | | | २ | ३ | ४ |
| **भाग - अ** | | | | | | |
| I. | **$ बँकिंग सिस्टिमला भारतामधील जबाबदा-या (£)** | | | | | |
| | (अ) | डिमांड लायाबिलिटीज | | | | |
| | | (i) | भारतीय स्टेट बँक, दुय्यम बँका व संगत नव्या बँकांनी त्या सहकारी बँकेतील चालु खात्यात ठेवलेल्या शिल्लकांची बेरीज | | | |
| | | (ii) | बँकिंग सिस्टिमला इतर डिमांड लायाबिलिटीजची बेरीज | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (ब) | बँकिंग सिस्टिमला असलेल्या टाईम लायाबिलिटीज | | | |
| | **१ ची बेरीज** | | | | |
| II. | इतरांबाबत भारतामधील जबाबदा-या X | | | | |
| | (अ) | डिमांड लायाबिलिटीज | | | |
| | (ब) | टाईम लायाबिलिटीज | | | |
| | **(२) ची एकूण बेरीज** | | | | |
| III. | बँकिंग सिस्टिम मधील भारतातील ॲसेट्स | | | | |
| | (अ) | भारतीय स्टेट बँक, तिच्या सहाय्यक बँका व संगत नव्या बँकांमधील चालु खात्यात ठेवलेल्या क्रेडिट बॅलन्सेसची बेरीज (%) | | | |
| | (ब) | बँकिंग सिस्टिममधील इतर ॲसेट्सची बेरीज. उदा (१) वरील बाब ३(अ) मधील सोडून इतर सर्व खात्यातील शिल्लका (२) मनी ॲट कॉल व शॉर्ट नोटिस (३) अग्रिम राशी आणि (४) अन्य ॲसेट्स. | | | |
| IV. | ह्या अधिनियमाच्या कलम १८ व २४ साठी एकूण (निव्वळ) डिमांड व टाईम लायाबिलिटीज (१-३) ही धन संख्या असल्यास (१-३) अ २; (१-३) ही ऋण संख्या असल्यास फक्त २. | | | | |
| V. | हातातील रोकड (&) | | | | |
| VI. | पुढील बँकांमधील चालु खात्यांमधील शिल्लक | | | | |
| | (अ) | रिझर्व बँक ++ | | | |
| | (ब) | संबंधित राज्याची राज्य सहकारी बँक (+) | | | |
| | (क) | संबंधित जिल्ह्याची केंद्रीय सहकारी बँक | | | |
| | **६ ची एकूण बेरीज** | | | | |
| VII. | पुढील बँकांमधील इतर सर्व खात्यांमधील शिल्लक | | | | |
| | (अ) | त्या राज्याची राज्य सहकारी बँक | | | |
| | (ब) | जिल्हा केंद्रीय सहकारी बँक | | | |
| | **७ ची बेरीज** | | | | |
| VIII. | चालु खात्यांतील निव्वळ शिल्लक, म्हणजे, १(अ)(१) पेक्षा ३(अ) ची अतिरिक्त रक्कम | | | | |
| **भाग - ब** | | | | | |
| कलम १८ चे अनुपालन (अनुसूचित राज्य सहकारी बँकांना लागु नाही) | | | | | |
| IX. | मागील दुस-या पंधरवड्याच्या शेवटच्या शुक्रवारी असलेल्या (४) चे ३ टक्के | | } } } } } } | माहिती देऊ नये | |
| X. | प्रत्यक्षात ठेवलेला रोख राखीव निधी = V+VI+VIII | | } } | | |
| **भाग - क** | | | | | |
| कलम २४ चे अनुपालन :<br>(अनुसूचित राज्य सहकारी बँकांना लागु नाही) | | | | | |
| XI. | मागील दुस-या पंधरवड्याच्या शेवटच्या शुक्रवारी असलेल्या ४ चे २५ टक्के (किंवा ह्यापेक्षा अधिक विहित टक्के) | | | | |
| XII. | प्रत्यक्षात ठेवलेले ॲसेट्स | | | | |
| | (अ) | भारतात ठेवलेली रोकड व इतर शिल्लका १०-९अ७. | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (ब) | सोने££ | | | | |
| | (क) | भाररहित मंजुरीप्राप्त सिक्युरिटीज् $$ | | | | |
| | **१२ ची एकूण बेरीज** | | | | | |
| **भाग ड :** कलम २४ चे अनुपालनः (अनुसूचित/राज्य सहकारी बँकांना लागु) | | | | | | |
| XIII. | मागील दुस-या पंधरवड्याच्या शेवटच्या शुक्रवारी असलेल्या ६ चे २५ टक्के (किंवा ह्यापेक्षा अधिक विहित टक्के) | | | | | |
| XIV. | प्रत्यक्षात ठेवलेले ॲसेट्स | | | | | |
| | (अ) | हातातील रोकड | | | | |
| | (ब) | भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ च्या कलम ४२ खाली ठेवणे आवश्यक असल्यापेक्षा अतिरिक्त असलेली रिझर्व बँकेत ठेवलेली शिल्लक (म्हणजे VI(अ)) | | | | |
| | (क) | चालु खात्यांमधील निव्वळ शिल्लक (म्हणजे VIII) | | | | |
| | (ड) | सोने££ | | | | |
| | (ई) | भाररहित मंजुरीप्राप्त सिक्युरिटीज $$ | | | | |
| | (फ) | पुढील बँकांमधील इतर सर्व प्रकारच्या शिल्लका | | | | |
| | | (१) | संबंधित राज्याची राज्य सहकारी बँक (+) | | | |
| | | (२) | संबंधित जिल्ह्याची केंद्रीय सहकारी बँक | | | |

सही /-

तारीख :

**तळटीपा**

(१) ह्या फॉर्ममधील अहवाल, बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ (सहकारी सोसायट्यांना लागु असल्याप्रमाणे) च्या कलम २४ खाली, अनुसूचित राज्य सहकारी बँकांनी आणि ह्या अधिनियमाच्या कलम २४ व १८ खाली इतर सहकारी बँकांनी, संबंधित महिन्याच्या समाप्तीनंतर १५ दिवसांच्या आत रिझर्व बँकेकडे सादर करावयाचा आहे.

(२) पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ (१८८१ चा २६) खाली, एकाआड येणा-या शुक्रवारी रजा असल्यास, त्याच्या आदल्या कामाच्या दिवशी व्यवहार बंद होतेवेळीचे आकडे दिले जावेत.

£. ह्या अहवालापुरते, भारतातील लायाबिलिटीज् मध्ये पुढील बाबी समाविष्ट असणार नाहीत

(१) त्या सहकारी बँकेच्या नफा व तोटा लेखेमधील कोणताही क्रेडिट बॅलन्स किंवा तिचे भरणा झालेले भांडवल

(२) राज्य सहकारी बँक किंवा केंद्रीय सहकारी बँक ह्यांच्या बाबतीत, तिच्या अधिकार कक्षेतील कोणत्याही सहकारी सोसायटीने, राखीव निधीच्या किंवा त्याच्या एका भागाच्या स्वरुपात ठेव म्हणून ठेवलेला निधी.

(३) केंद्रीय सहकारी बँकेच्या बाबतीत तिने संबंधित राज्याच्या राज्य सहकारी बँकेकडून घेतलेली अग्रिम राशी

(४) एखाद्या प्राथमिक सहकारी बँकेने, संबंधित राज्याच्या राज्य सहकारी बँकेकडून किंवा संबंधित जिल्ह्याच्या केंद्रीय बँकेकडून घेतलेली कोणतीही अग्रिम राशी.

(५) एखाद्या सहकारी बँकेने, मंजुरीप्राप्त सिक्युरिटीजच्या विरुध्द, कोणतीही अग्रिम राशी किंवा कर्ज व्यवस्थेतून काढलेली किंवा मिळविलेली रक्कम

(६) एखाद्या सहकारी बँकेत ठेवलेल्या शिल्लक विरुध्द तिने अग्रिम राशी दिली असल्यास, अशा अग्रिम राशीच्या आऊटस्टँडिंग असलेल्या रकमेपर्यंतची रक्कम

$ ह्या अहवालासाठी, बँकिंग सिस्टिम म्हणजे पुढील बँका व वित्तसंस्था असतील -

(१) भारतीय स्टेट बँक

(२) दुय्यम बँका

(३) संगत नव्या बँका

(४) प्रादेशिक ग्रामीण बँका

(५) बँकिंग कंपन्या

(६) बँकिंग विनियमन अधिनियम, १९४९ (सहकारी सोसायट्यांना लागु असल्याप्रमाणे) च्या कलम १८ च्या पोटकलम (१) च्या स्पष्टीकरणातील खंड (ड) खाली, केंद्र सरकारने ह्याबाबत अधिसूचित केलेल्या इतर वित्तसंस्था

(X) ह्या अहवालासाठी, इतरांना असलेल्या भारतातील लायाबिलिटीज् मध्ये, राज्य सरकार, रिझर्व बँक, आयडीबीआय, एक्झिम बँक, नाबार्ड ह्यांच्याकडून घेतलेली, किंवा राष्ट्रीय सहकारी विकास अधिनियम १९६२ च्या

कलम ३ खाली स्थापन केलेल्या राष्ट्रीय विकास निगमाकडून घेतलेली कर्जे समाविष्ट नाहीत.

(%) (१) एखाद्या सहकारी बँकेने, दुस-या बँकेत ठेवलेली शिल्लक ही, अशा सहकारी बँकेची ॲग्रिकल्चरल क्रेडिट स्टेबिलायझेशन फंडमधील गुंतवणुक म्हणून ठेवली असल्यास, ती शिल्लक भारतात ठेवलेली रोख रक्कम म्हणून समजली जाणार नाही.

(२) ह्या सहकारी बँकेने, संबंधित राज्य सहकारी बँकेमध्ये किंवा संबंधित जिल्ह्याच्या केंद्रीय सहकारी बँकेमध्ये ठेवलेल्या शिल्लकेच्या विरुध्द अग्रिम राशी घेतली असल्यास, अशा घेतलेल्या रकमेपर्यंतची रक्कम भारतात ठेवलेली रोख रक्कम म्हणून समजली जाणार नाही.

(&)(१) ह्या अहवालासाठी, एखाद्या सहकारी बँकेमधील कोणतीही रोख रक्कम ही, अशा सहकारी बँकेची, ॲग्रिकल्चरल क्रेडिट स्टेबिलायझेशन निधीमधील शिल्लक म्हणून असल्यास, ती रक्कम भारतात ठेवलेली रोख रक्कम समजली जाणार नाही

(२) रोख रक्कम ह्या संज्ञेत, इतर बँकांमध्ये असलेली शिल्लक किंवा ह्या अहवालाच्या तारखेस वैध असलेल्या बँक/चलनी नोटा, रुपयांची नाणी (एक रुपयाच्या नोटांसह) आणि दुय्यम नाणी सोडल्यास अन्य कोणतीही बाब समाविष्ट असणार नाही

(++) अनुसूचित राज्य सहकारी बँकांनी, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या कलम ४२ खाली रिझर्व बँकेत ठेवणे आवश्यक असलेल्या शिल्लकेपेक्षा जास्त असलेली रक्कमच येथे दाखवावी.

(+) केवळ राज्य औद्योगिक सहकारी बँका, केंद्रीय सहकारी बँक, जिल्हा औद्योगिक सहकारी बँका व प्राथमिक सहकारी बँकांनाच लागु

(X) फक्त प्राथमिक सहकारी बँकांनाच लागु

($$)(१) रिझर्व बँकेने मूल्यांकनासाठी ठरविलेल्या रीतीवर आधारित मूल्यांकन केले आहे

(२) एखाद्या सहकारी बँकेच्या ॲग्रिकल्चरल क्रेडिट स्टेबिलायझेशन फंडाच्या पैशाची गुंतवणुक म्हणून असलेल्या मंजुरीप्राप्त सिक्युरिटीज किंवा त्यांचा भाग हा भाररहित मंजुरीप्राप्त सिक्युरिटीज् म्हणून समजला जाणार नाही.

(££.) विद्यमान बाजार मूल्यापेक्षा अधिक नसलेल्या मूल्याने मूल्यांकन केले आहे.